20060429142445001

उच्च माध्यमिक स्तरावर शिकविणाऱ्या अर्हताधारक शिक्षकांच्या कार्यभाराबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक : एचएससी १३०५/(६३/०५)/उमाशि-१
मंत्रालय विस्तारभवन, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १ डिसेंबर, २००५.

वाचा: - १) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : एचएससी १३९९/ २८१२२/ (२३७०)/उमाशि-१, दिनांक २४.११.२०००

२) शासन परिपत्रक, शालेय शिक्षण विभाग, क्रमांक : एचएससी १३०४/ (३६०/०४)/उमाशि-१, दिनांक ९.११.२००४.

प्रस्तावना :- उच्च माध्यमिक स्तरावर शिकविणाऱ्या अर्हताधारक पूर्णवेळ शिक्षकांचा कार्यभार नियमानुसार १७/१८ घड्याळी तास असणे आवश्यक आहे. परंतु काही उच्च माध्यमिक शाळांमध्ये आवश्यक तो कार्यभार उपलब्ध होत नसल्यामुळे वरील वाचा येथील दिनांक २४.११.२००० व ९.११.२००४ च्या शासन परिपत्रकान्वये, शिक्षकास पूर्णवेळ मान्यता देण्यासाठी कार्यभार गृहित करण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. तथापि ज्याठिकाणी कनिष्ठ महाविद्यालयाच्या एक एक तुकड्या अस्तित्वांत आहेत त्याठिकाणी प्रामुख्याने भाषा विषयाचे तसेच विज्ञान विषयाचे शिक्षक तासिका तत्वावर उपलब्ध होत नाहीत. पर्यायाने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होते. असे काही लोक प्रतिनिधी व शिक्षक संघटनांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. ही बाब विचारांत घेता ५० टक्के पदव्युत्तर पदवी विषयाचा कार्यभार व ५० टक्के पदवी विषयांचा कार्यभार विचारांत घेऊन उच्च माध्यमिक शिक्षकांना पूर्णवेळ मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची संबंधित विषयात पदव्युत्तर पदवी (द्वितीय श्रेणी) +बी.एड. अशी विहित केली आहे. ज्या विषयाचा कार्यभार उपलब्ध आहे त्या विषयात सदर शैक्षणिक अर्हता असलेले व १८ घड्याळी तास कार्यभार उपलब्ध असल्यास पूर्णवेळ उच्च माध्यमिक शिक्षक म्हणून मान्यता देण्यात येते.

२. उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांना विहित कार्यभार उपलब्ध होऊन पूर्णवेळ म्हणून मान्यता देण्याबाबत वरील वाचा येथील शासन परिपत्रकांबरोबरच शासन आता खालीलप्रमाणे आदेश देत आहे:-

ज्या उच्च माध्यमिक शाळेत / कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षकाला पदव्युत्तर विषयातील १७/१८ घड्याळी तासाच्या ३/४ कार्यभार उपलब्ध होत नाही, तिथे ह्या शिक्षकांचा पदव्युत्तर विषयाचा ५० टक्के व पदवी पातळीवरील एका विषयाचा ५० टक्के कार्यभार विचारात घेऊन त्या शिक्षकाला पूर्णवेळ मान्यता द्यावी व त्याने तीन ते चार वर्षात दुसऱ्या विषयातील पदव्युत्तर पदवी उत्तीर्ण करावी.

असे शिक्षक तीन ते चार वर्षाच्या कालावधीत दुसऱ्या विषयातील पदव्युत्तर विषयात पदवी प्राप्त करुन घेतील असे त्यांनी १०० रुपयांच्या बंधपत्रावर लिहून देणे आवश्यक राहिल. तथापि तीन ते चार वर्षाच्या कालावधीत ही अर्हता जे शिक्षक धारण करणार नाहीत त्यांना वरीलप्रमाणे दिलेली सवलत आपोआप संपुष्टात येईल,असे त्यांच्या मान्यतेच्या / नियुक्तीच्या आदेशातच नमूद करण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(म.मा.मोरवे)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,
शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ),महाराष्ट्र राज्य,पुणे.
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
सर्व शिक्षणाधिकारी( माध्यमिक ) जिल्हा परिषद.
सर्व शिक्षण निरीक्षक ,मुंबई( दक्षिण/उत्तर/पश्चिम ).
निवड नस्ती - कार्यासन -उमाशि-१